# उल्हासनगर महानगरपालिका

## मालमत्ता कर विभाग

मुख्य कार्यालय, तळमजला, उल्हासनगर- ४२१ ००३ जिल्हा ठाणे, महाराष्ट्र

Tel No:- 95251-2720116/125 Ext. No. 238 Fax No:- 95251-2720104


जा. क्र. उमपा/कर विभाग/ यु. २/१७७/२२

दिनांक - १८ मे २०२३

संदर्भ -१)श्री राजा गेमनानी पार्टनर तर्फे बन्सवानी बिल्डर, ब्लॉक नं. ए ५९/रुम नं. ३५३ व ३५४ गोल मैदान शिवसागर कॉम्पलेक्स,उल्हासनगर-१ यांचा दि २९/३/२०२३ रोजीचा अर्ज (टोकन नं. ४१२०२३०००००६००८)

२)मा आयुक्त यांनी दिनांक ६/४/२०२३ रोजी दिलेली सुचना/निर्देश

३)जा.क्र उमपा/कर विभाग/यु क्र २/१७७/२२ दिनांक २१/०४/२०२३ रोजीची बैठकीची सुचना

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. १३बीआय०१८२९२३०० (ब्लॉक नं. ए ५९/रुम नं. ३५३ व ३५४ गोल मैदान शिवसागर कॉम्पलेक्स उल्हासनगर-१) अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता मालमत्ता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ कर देण्यास प्रथमतः पात्र व्यक्ती म्हणुन **शिव सागर कॉम्पलेक्स** अशी नोंद आहे

२) सदर मिळकतीचे वर्ष २०२२-२०२३ (दि ५/३/२०२३) करीताचे कर बिलात मालमत्ता कर रक्कम रु. २१,१३,०१४/- अधिक विलंब शास्ती रक्कम रु. २७,०१,१८५/- असे एकत्रित रक्कम रु. ४८,१४,१९९/- थकबाकी दाखविण्यात आली आहे.

३) श्री राजा गेमनानी पार्टनर तर्फे बन्सवानी बिल्डर यांनी संदर्भ क्र १ नुसार मालमत्ता क्र. १३बीआय०१८२९२३०० चे कर बिलातील विलंब शास्ती जास्त लावण्यात आली असुन ती सुधारीत करुन बिल देणे व त्यानुसार कर भरणा करणेबाबत कळविण्यात आले आहे.

४) त्याअनुषंगाने विलंब शास्तीची पडताळणी करुन अभिप्राय देणेबाबत मे. कोल्ब्रो ग्रुप यांना जा क्र उमपा/करवि/ यु क्र २/१७८/२२ दिनांक २९/०३/२०२३ रोजी सुचित करण्यात आले होते. मे. कोल्ब्रो ग्रुप यांनी 211/UMC/KG/20233 दिनांक ३१/०३/२०२३ रोजीचे पत्रान्वये दिनांक ०८/१२/२०२२ रोजी संगणक विभागाकडून मालमत्तांची थकबाकीची माहिती त्यांना देण्यात आली असुन त्यामध्ये मालमत्ता क्र. १३बीआय०१८२९२३०० करीता रक्कम रु. २७,००,८४७/- इतकी विलंब शास्तीची नोंद देण्यात आली होती. सदर मालमत्तेची थकबाकीचा भरणा न केल्यामुळे माहे जानेवारी २०२३, फेब्रुवारी २०२३, मार्च २०२३ या ३ महिन्यांसाठी विलंब शास्ती रक्कम रु. २९,९२,३१६/- मालमत्तेवर आकारण्यात आली आहे.

५) मे. कोल्ब्रो ग्रुप, नागपूर यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार मालमत्ता क्र. १३बीआय०१८२९२३०० करीता लागु करण्यात आलेल्या विलंब शास्ती रक्कमेबाबत सिस्टम मॅनेजर, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका यांना जा क्र उमपा/करवि/यु.क्र२/१७९, दिनांक ३१/०३/२०२३ रोजी विचारणा करण्यात आली. त्यानुसार सिस्टम मॅनेजर यांनी जा क्र उमपा/मातंवि/०५/२०२३ दिनांक ०३ एप्रिल २०२३ रोजी पत्रान्वये याआधी मे. ए. बी. एम नॉलेजवेअर लिमिटेड कंपनीकडून संगणक प्रणालीमध्ये तांत्रिक सुधारणा करण्यात येत होती. मात्र सदर कंपनीकडून ऑन साईट हेल्प डेस्क सपोर्ट व ऑफ साईट बंद करण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर बाब निदर्शनास आल्यानंतर मालमत्ता कर विभागातील उप कर निर्धारक व संकलक आणि माहिती तंत्रज्ञान विभागातील कर्मचारी यांची चर्चा झाल्यानंतर संगणक विषयक तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करुन त्यामध्ये योग्य आकारणी करुन मालमत्ता क्र. १३बीआय०१८२९२३०० करीता सुधारीत देयक सादर करण्यात आले आहे. सदर कराचे बिल मे. ए. बी. एम नॉलेजवेअर लिमिटेड (दिनांक ०३/०४/२०२३ रोजी) यांचेकडील संगणकप्रणाली सुधारीत करण्यात आले आहे. त्यामध्ये मालमत्ता कर रक्कम रु. २०,५५,२३४/- अधिक विलंब शास्ती रक्कम रु. १,९८,९२८/- असे एकत्रित रक्कम रु. २२,५४,१६२/- थकबाकी दाखविण्यात आली आहे.

६) विषयांकित प्रकरणी मा. आयुक्त यांनी दिनांक ६/४/२०२३ रोजी उप आयुक्त (कर), सीएफसी, मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखा परिक्षक यांची दिनांक २६/४/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता संयुक्त बैठक आयोजित करणेबाबत सुचना/निर्देश दिले. त्यानुसार पत्र क्र उमपा/कर विभाग/यु क्र २/१७७/२२ दिनांक २१/०४/२०२३ नुसार मा. आयुक्त यांचे दालनात बुधवार दिनांक २६ एप्रिल २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता बैठक आयोजित करण्यात आली.

दिनांक २६ एप्रिल २०२३ रोजी बैठकीत झालेल्या चर्चेअंती मा आयुक्त यांनी विषयांकित प्रकरणी विलंब शास्तीबाबत स्वयंस्पष्ट अभिप्राय देणेबाबत सिस्टम मॅनेजर, माहिती तंत्रज्ञान विभाग यांना सुचित केले होते.

Scanned with CamScanner

७)   त्यानुसार सिस्टम मॅनेजर यांनी जा क्र उमपा/मातंवि/७५/२०२३ दिनांक २६ एप्रिल २०२३ नुसार मे ए. बी. एम नॉलेजवेअर लि मालमत्ता कर संगणक प्रणालीमध्ये सर्च केले असता मालमत्ता क्र. १३बीआय०१८२९२३०० शिवसागर कॉम्पलेक्स करिता वर्ष २०२१-२२ मध्ये मालमत्ता कर विभागातील आदेश क्र जा.क्र.उमपा/करवि/यु२/११६/२१ दिनांक १७/६/२०२२ अन्वये वर्ष २०२१-२२ मध्ये सुधारणा करण्यात आलेले दिसुन येते. सदर आदेशान्वये शिवसागर कॉम्पलेक्स बिल्डींग निष्कासित करुन २० मिळकतींचे देयकांची नोंद स्थगित करण्यात आलेली असुन मालमत्ता क्र. १३बीआय०१८२९२३०० अन्वये नोंद कायम ठेवून सदरच्या देयकामध्ये निष्कासन खर्च रु. १८,७७,३४४/- समाविष्ट करण्यात आलेला आहे. त्यामुळे विलंब शास्तीची रक्कम तांत्रिक कारणांमुळे जास्तीची आकारणी झालेली असल्याचे दिसुन आले. त्याअनुषंगाने मे ए.बी.एम नॉलेजवेअर लि मालमत्ता कर संगणकप्रणालीमध्ये विलंब शास्ती सुधारीत करुन सुधारीत देयक तयार करण्यात आलेले आहे. त्यामध्ये मालमत्ता कर रक्कम रु. २०,५५,२३४/- अधिक विलंब शास्ती रक्कम रु. १,९८,९२८/- असे एकत्रित रक्कम रु. २२,५४,१६२/- थकबाकी दाखविण्यात आली आहे.

सिस्टम मॅनेजर यांनी जा क्र उमपा/मातंवि/७६/२०२३ दिनांक २६ एप्रिल २०२३ नुसार मे ए. बी. एम नॉलेजवेअर लि मालमत्ता कर संगणक प्रणालीमध्ये सर्च केले असता मालमत्ता क्र. १३बीआय०१८२९२३०० शिवसागर कॉम्पलेक्स करिता वर्ष २०२१-२२ मध्ये मालमत्ता कर विभागातील आदेश क्र उमपा/करवि/यु२/ ११६/२१ दिनांक १७/६/२०२२ अन्वये वर्ष २०२१-२२ मध्ये सुधारणा करण्यात आलेले दिसुन येते. सदर आदेशान्वये शिवसागर कॉम्पलेक्स बिल्डींग निष्कासित करुन २० मिळकतींचे देयकांची नोंद स्थगित करण्यात आलेली असुन मालमत्ता क्र. १३बीआय०१८२९२३०० अन्वये नोंद कायम ठेवून सदरच्या देयकामध्ये निष्कासन खर्च रु. १८,७७,३४४/- समाविष्ट करण्यात आलेला आहे.

सदर बिलामध्ये दर्शविण्यात आलेली विलंब शास्तीची रक्कम खालीलप्रमाणे आकारणी होणे आवश्यक होते मात्र तांत्रिक कारणांमुळे विलंब शास्ती जास्तीची आकारणी झालेली असल्याचे दिसुन आले.

| थकबाकी रक्कम | प्रति माह शास्ती | | |
|---|---|---|---|
| १९८५९१८ | x २ % | ३९७१८ | ०१-ऑगस्ट-२२ |
| | | ३९७१८ | ०१-सप्टेंबर-२२ |
| | | ३९७१८ | ०१-ऑक्टोंबर-२२ |
| | | ३९७१८ | ०१-नोव्हेंबर-२२ |
| | | ३९७१८ | ०१-डिसेंबर-२२ |
| विलंब शास्ती एकुण रक्कम | | १९८५९० | |

त्याअनुषंगाने वरीलप्रमाणे शास्तीची रक्कम मे ए.बी.एम नॉलेजवेअर लि मालमत्ता कर संगणकप्रणालीमध्ये विलंब शास्ती सुधारीत करुन सुधारीत देयक तयार करण्यात आलेले आहे. त्यामध्ये मालमत्ता कर रक्कम रु. २०,५५,२३४/- अधिक विलंब शास्ती रक्कम रु. १,९८,९२८/- असे एकत्रित रक्कम रु. २२,५४,१६२/- थकबाकी दाखविण्यात आली आहे.

८)   अधिनियमाचे अनुसूची ड चे प्रकरण ८-कराधान नियम यातील नियम ४१-बिलाच्या न दिलेल्या रकमेवर शास्ती आकारणे-(१) उपरोक्तप्रमाणे दिलेले असेल अशा बिलामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे पहिल्या सहामाही कराची रक्कम, बिल दिल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत भरावयाची असेल आणि बिलामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे दुसऱ्या सहामाही करची रक्कम, प्रत्येक वर्षाच्य ३१ डिसेंबरपूर्वी भरावयाची असेल, आणि जर, कराची रक्कम भरण्या पात्र असलेल्या व्यक्तीने उपरोक्तप्रमाणे आवश्यक असल्याप्रमाणे कराची रक्कम भरली नाही तर, अशी अदत्त कराची रक्कम किंवा त्या रकमेचा भाग यांव्यतिरिक्त, त्याने ज्या दिनांकापर्यंत असा कर भरावयाचा होता, त्या शेवटच्या दिनांकानंतर प्रत्येक महिन्यासाठी किंवा त्याच्या भागासाठी अशा कराच्या दोन टक्के इतकी रक्कम, शास्ती म्हणून भरण्यास तो जबाबदार असेल आणि बिलाची पूर्ण रक्कम देईपर्यंत अशी शास्ती भरण्यास तो जबाबदार असण्याचे चालू राहील,

परंतू, मुंबई प्रांतिक महानगरपालिका, नागपूर शहर महानगरपालिका, महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगर, महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन आणि महाराष्ट्र (मोठया निवासी जागा असलेल्या) इमारतीवरील कर (पुन्हा अधिनियमित केलेला) (सुधारणा) अधिनियम, २००९ (२०१० चा महा.१०) (यात यापुढे ज्याचा निर्देश २००९ चा सुधारणा अधिनियम असा करण्यात आला आहे) याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, या अधिनियमान्वये ज्यासाठी बिल देण्यात आले आहे, असा कोणताही मालमत्ता कर पूर्णपणे किंवा अंशत : अदत्त राहिला असेल, ज्या व्यक्तीने असा कर भरलेला नाही ती व्यक्ती उक्त २००९ च्या सुधारणा अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास व दिनांकापासून, या कलमान्वये तरतुद केल्याप्रमाणे, अशा करावरील शास्ती भरण्यास जबाबदार असेल.

(२) बिलामधील अन्य कर किंवा मागणी केलेल्या देय रकमा, बिला विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास न भरल्यास, पोट-नियम (१) च्या तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह अशा न भरलेल्या रकमेला लागू होता.

Scanned with CamScanner

९) अधिनियमाचे अनुसूची ड चे प्रकरण ८-कराधान नियम यातील नियम ५१-शास्ती फी किंवा वसुलीचा खर्च माफ करता येईल-आयुक्तास, आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार, नियम ४१ खालील शास्ती, किंवा नियम ५० खालील फी किंवा वसुलीचा खर्च पुर्णत : किंवा अंशत : माफ करता येईल अशी तरतुद आहे.

१०) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४८५ आकारणी इत्यादीतील उपचार व चूका यामुळे अशी आकारणी इत्यादी बेकायदेशिर ठरते असे मानले जाणार नाही. (१) या अधिनियमान्वये किंवा कोणताही नियम, विनियम, उपविधी किंवा स्थायी आदेश या अन्वये काढलेल्या कोणत्याही आकारणीत किंवा कोणत्याही अटकावणीत किंवा केलेल्या जप्ती किंवा काढलेल्या कोणत्याही नोटीशीत, बिलात, अनुसूचीत, समन्समध्ये किंवा अन्य दस्तऐवजात कोणताही उपचार दोष, लेखन, प्रमाद, वर्जन किंवा अन्य दोष असल्यास ते कोणत्याही वेळी, शक्य असेल तेथवर दुरुस्त करता येईल. अशी तरतुद आहे.

११) उक्त बाबी पाहता उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. १३बीआय०१८२९२३०० (ब्लॉक नं. ए ५९/रुम नं. ३५३ व ३५४ गोल मैदान शिवसागर कॉम्पलेक्स उल्हासनगर-१) अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता मालमत्ता कराची मुळ थकबाकी अधिक इमारत निष्कासनाचा खर्च रक्कम रु. १९,८५,९१८/- इतक्या रकमेवर दिनांक ०१ ऑगस्ट २०२२ पासुन अधिनियमाचे अनुसूची ड चे प्रकरण ८-कराधान नियम यातील नियम ४१ नुसार प्रतिमाह २ टक्के दराने रक्कम रु ३९,७१८/- इतकी विलंब शास्ती आकारणी करणे आवश्यक होते. परंतु तांत्रिक कारणामुळे रक्कम रु २७,०१,१८५/- इतकी विलंब शास्ती समाविष्ट झाली आहे. वास्तविक सदरील विलंब शास्ती रक्कम सुधारीत करणे आवश्यक आहे.

१२) त्याअनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४८५ तसेच अधिनियमाचे अनुसूची ड चे प्रकरण ८-कराधान नियम यातील नियम ४१ व नियम ५१ मधील तरतुदी तसेच सिस्टम मॅनेजर यांचेकडील पत्र क्र उमपा/मातंवि/७६/ २०२३ दिनांक २६ एप्रिल २०२३ व त्यासोबत जोडलेले बिलात नमुद विलंब शास्ती विचारात घेवुन उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. १३बीआय०१८२९२३०० (ब्लॉक नं. ए ५९/रुम नं. ३५३ व ३५४ गोल मैदान शिवसागर कॉम्पलेक्स उल्हासनगर-१) अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता विलंब शास्ती सुधारीत करुन वर्ष २०२३-२०२४ करीता बिल बजावणेस शिफारस करण्यात आली आहे. त्यास मा प्रशासक तथा आयुक्त यांनी दिनांक २ मे २०२३ रोजी मंजुरी दिलेली आहे.

यास्तव पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४८५ तसेच अधिनियमाचे अनुसूची ड चे प्रकरण ८-कराधान नियम यातील नियम ४१ व नियम ५१ मधील तरतुदी तसेच सिस्टम मॅनेजर यांचेकडील पत्र क्र उमपा/मातंवि/७६/२०२३ दिनांक २६ एप्रिल २०२३ व त्यासोबत जोडलेले बिलात नमुद विलंब शास्ती विचारात घेवुन उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. १३बीआय०१८२९२३०० (ब्लॉक नं. ए ५९/रुम नं. ३५३ व ३५४ गोल मैदान शिवसागर कॉम्पलेक्स उल्हासनगर-१) अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता विलंब शास्ती सुधारीत करुन वर्ष २०२३-२०२४ करीता बिल बजावण्यात यावे

(जेठानंद ना करमचंदानी)
कर निर्धारक व संकलक
उल्हासनगर महानगरपालिका

मा. आयुक्त यांच्या मंजुरीने

प्रति
१) मालमत्ता कर विभाग / मे कोल्ब्रो ग्रुप
२) श्री राजा गेमनानी पार्टनर तर्फे बन्सवानी बिल्डर, ब्लॉक नं. ए ५९/रुम नं. ३५३ व ३५४ गोल मैदान शिवसागर कॉम्पलेक्स उल्हासनगर-१

प्रत-
१) मा प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांना माहितीस्तव सादर
२) मा उप आयुक्त (कर), उल्हासनगर महानगरपालिका यांना माहितीस्तव सादर

Scanned with CamScanner

८१

# उल्हासनगर महानगरपालिका

जा. क्र./उमपा/करवि/यु.क्र.२/१७६/२२
दिनांक२९/०३/२०२३

**विषय** - मालमत्ता क्र. १३BI०१८२९२३०० अन्वये विलंब शास्तीत सुधारणा करणे बाबत.

**सादर**

अर्जदार श्री. राजा गेमनानी पार्टनर तर्फे बन्सवानी बिल्डर, पत्ता - ब्लॉक क्र. ए - ५९/रूम क्र. ३५३ अॅन्ड ३५४, गोल मैदान, शिव सागर कॉम्पेलक्स, उल्हासनगर - १ यांनी दिनांक २९/०३/२०२३ रोजी सादर केलेल्या अर्जानुसार मालमत्ता करात विलंब शास्ती जास्त लागुकेल्यामुळे सुधारणा करणेबाबत अर्ज केला आहे.
अर्जदाराने दाखल केलेल्या अर्जानुसार संगणक प्रणालीत तपासणी केली असता बिलात शास्तीची रक्कम जास्त लावण्यात आल्याचे दिसुन आले आहे.

उपरोक्त विषयांन्वये सादर करण्यात येते की, मालमत्ता क्र. १३BI०१८२९२३०० अन्वये वर्ष २०२१-२२ करीता एकुण कर देयक थकबाकी रक्कम रू. २०५५२३४/- विलंब शास्ती रक्कम रू. २७०११८५/- ही आकारण्यात आलेली आहे.

**अधिनियमाचे कलम ४८५ आकारणी इत्यादीतील उपचार व चुका यामुळे अशी आकारणी इत्यादी बेकायदेशीर ठरते असे मानले जाणार नाही.**

(१) या अधिनियमान्वये किंवा कोणताही नियम, विनियम,उपविधी किंवा स्थायी आदेश या अन्वये काढलेल्या कोणत्याही आकारणीत किंवा कोणत्याही अटकावणीत किंवा केलेल्या जप्ती किंवा काढलेल्या कोणत्याही नोटशीत, बिलात, अनुसूचीत, समन्समध्ये किंवा अन्य दस्तऐवजात कोणताही उपचार दोष, लेखन, प्रमाद, वर्जन किंवा अन्य दोष असल्यास ते कोणत्याही वेळी, शक्य असेल तेथवर दुरूस्त करता येईल.
त्यानुसार विलंब शास्ती सुधारीत वर्ष २०२२-२३ करीता सुधारीत बिल करून देणे करीता पुढील आदेशार्थ सादर

(शंकर आहिरे)
लिपीक

(उषा मोळे)
कर निरीक्षक

(उध्दव लुल्ला)
उप-कर निर्धारक व संकलक

(जेठानंद करमचंदानी)
कर निर्धारक व संकलक

1) दि. ०5/03/23 रोजीच्या देयकामध्ये रु. 2701185/- ही शास्ती लागलेली आहे. [illegible]
2) कोल्हो ... करून ... देयक सादर करावा
29/3/23

(प्रियंका राजपूत)
... (कर)

Scanned with CamScanner

दि. 31/03/2023

फेर सादर

मा. उप. आयुक्त (कर) यांनी दिलेल्या निर्देशानुसार विषयांकित प्रकरणी मे. कोलबो मुर नागपुर यांना विषयांकित प्रकरणी अहवाल सादर करणे बाबत पत्र मान्यतेस व स्वाक्षरी करीता सोबत जोडत आहे.

(शंकर माहिरे)
लिपीक

(उषा गौळे)
कर निरीक्षक

(उद्धव लुल्ला)
उप. कर निर्धारक व संकलक

(जेठानंद करमचंदानी)
कर निर्धारक व संकलक

Scanned with CamScanner

21/3

दि. ३१।०३।२०२३

फेरसादर

मा. उप-आयुक्त (कर) यांनी दिलेल्या निर्देशानुसार विषयांकित प्रकरणी मे कोलब्रो ग्रुप, नागपूर यांचेकडून दि. २१।०३।२०२३ रोजीच्या पत्रान्वये अहवाल घेण्यात आला आहे. त्याची प्रत पृष्ठ क्र. 13 आहे.

सदर अहवालामध्ये मे कोलब्रो ग्रुप नागपूर यांनी दि. ०८।१२।२०२२ रोजी संगणक विभागाकडून मालमत्ता

'अ' { थकबाकी माहिती आम्हाला देण्यात आली होती. त्यामध्ये मालमत्ता क्र. 13BE0182912300 असलेले थकबाकी माहिती

'ब' { देण्यात आली होती. त्यानुसार सदर मिळकती करीता रक्कम रु. २६,००,८४७/- विलंब शास्तीची नोंद करण्यात आली आहे.

तरी आपल्या माहितीस्तव पुढील आदेशार्थ सादर.

(शंकर अहिरे)
लिपीक

(उषा मोळे)
कर निरीक्षक

(उध्दव लुल्ला)
उप-कर निर्धारक संकलक

(जेठानंद करमचंदानी)
कर निर्धारक व संकलक

(प्रियंका राजपूत)
उप आयुक्त (कर)

वरील 'अ' प्रमाणे दि. ०८।१२।२०२२ रोजी CFC मधून माहिती कोलब्रो कं. ला प्राप्त झाली असल्याने सिस्टम मॅनेजर, CFC (विभागप्रमुख) यांचेकडून सादर रु. २६,००,८४७/- ही विलंब शास्ती कशी आली याबाबत अहवाल मागवावा. तसेच फेरसादर करा.
31/03/23

सिस्टम मॅनेजर यांना पत्र देण्यात यावे

श्री जेठा करमचंदानी
कर निर्धारक व संकलक

सादर

विषय — मालमत्ता क्र. 13BI018292300 अन्वये विलंब शास्ती सुधारित करणेबाबत.

उपरोक्त विषयान्वये श्री. राजा गेमनानी पार्टनर तर्फे बन्सवानी बिल्डर पत्ता ब्लॉक क्र.॥ ५९/रुम नं. ३५३ व ३५४,गोल मैदान, शिव सागर कॉम्पलेक्स, उल्हासनगर–१ यांनी दि. २९/०३/२०२३ रोजीच्या अर्जान्वये मालमत्ता क्र. 13BI018292300 या मालमत्तेची वर्ष २०२१–२२ ची विलंबशास्ती जास्त लागु केल्यामुळे सुधारणा करणेबाबत अर्ज केला आहे.

अर्जदाराने दाखल केलेल्या अर्जानुसार संगणक प्रणालीत तपासणी केली असता बिलात शास्तीनी रक्कम जास्त लावण्यात आल्याचे दिसुन आले आहे.

मालमत्ता क्र. 13BI018292300 या अन्वये वर्ष २०२१–२२ करीता एकुण कर देयक थकबाकी रक्कम रु. २०,५५,२३४/– व विलंबशास्ती रक्कम रु. २७,०१,१८४/– ही आकारण्यात आली आहे.

त्यानुसार विलंब शास्ती वर्ष २०२२–२३ करीता सुधारीत बिल करुन देणे करीता मे.कोल्ब्रो ग्रुप नागपुर यांना दि.३१/०३/२०२३ रोजी खुलासाबाबत पत्र देण्यात आले. तद्नंतर सदर कंपनीने दि. ३१/०३/२०२३ रोजी विलंबशास्ती बाबत खुलासा प्रत पृष्ठ क्र. १३ वर जोडला आहे. सदर खुलासाबाबत सविस्तर खालीलप्रमाणे

मे.कोल्ब्रो यांचे दि.०८/१२/२०२२ रोजी संगणक विभागाकडुन मालमत्तांची थकबाकीची माहिती आंम्हाला देण्यात आली होती. मिळालेल्या माहितीनुसार मालमत्ता क्र. 13BI018292300 पत्र बाबत संगणक विभागाकडुन विलंब शास्ती रक्कम रु.२७,००,८४७/– ची नोंद देण्यात आली होती. सदर मालमत्तेची थकबाकीची अदायगी न झाल्याने जानेवारी, फेब्रुवारी,मार्च या तीन महिन्याची विलंब शास्ती रक्कम जोडून २९,९२,३१६/– इतकी रक्कम विलंब शास्ती सदर मालमत्तेवर आकारण्यात आली आहे. असे लेखी पत्र दिले.

सदर मे.कोल्ब्रो यांनी दिलेल्या पत्रानुसार संगणक विभागाला दि.३१/०३/२०२३ रोजीचे पत्रानुसार रु.२७,००,८४७/–ही विलंब शास्ती कशी आली याबाबत खुलासाबाबत पत्र देण्यात आले. सदर पत्राच्या अनुषंगाने संगणक विभागाने दि.०३/०४/२०२३ यांनी पत्रानुसार खुलासा सादर केला आहे. तो खालीलप्रमाणे

**कर विभागातील कार्यदिशानुसार मे.ए.बी.एम.नॉलेजवेअर लिमिटेड कंपनीकडून संगणक प्रमाणलीमध्ये तांत्रिक सुधारणा करण्यात येत होती. मात्र सदर कंपनीकडुन ऑन साईट हेल्प डेस्क सपोर्ट व ऑफ साईट बंद करण्यात आलेली आहे.** त्यामुळे सदर बाब निदर्शनास आल्यानंतर संगणक विभागाने मालमत्तेत विलंबशास्तीत सुधारणा वर्ष २०२२–२३ च्या कर देयकात केली असुन सोबत करदेयक दिलेले आहे. सदर करदेयक पृष्ठ क्र.२१ वर असुन त्याची विलंब शास्ती थकबाकी रु.३३८/–इतकी, चालु मागणी रु.१,९८,५९०/–एकुण विलंबशास्ती थकबाकी रु.१,९९,९२८/–इतकी दर्शविली आहे.

तरी अर्जदार सुधारीत कर देयक भरण्यास तयार आहे असे अर्जात उल्लेख केला असल्याने सदर अर्जदारास वर्ष २०२२–२३ चे संगणक विभागाने दिलेले पृष्ठ क्र.२१ वरील कर देयक देऊन तो कर भरुन घेणेकरीता पुढील आदेशार्थ सादर. तसेच मे. कोल्ब्रो कंपनीला संगणक विभागाने दिलेले देयक देऊन त्याप्रमाणे त्यांचे संगणक प्रणालीत सुधारणा करुन देणेकरीता आदेशार्थ सादर.

(शंकर अहिरे)
लिपीक

(किशोर आईलसिंघानी)
कर निरिक्षक

(उध्दव लुल्ला)
उप कर निर्धारक व संकलक

(जेठानंद करमचंदानी)
कर निर्धारक व संकलक

(प्रियंका राजपूत)
उप–आयुक्त(कर)

(अजीज शेख)
प्रशासक तथा आयुक्त

मागील पुष्पावर दिलेल्या निवेदनानुसार सदर तिकिटाबाबतचे कामकाज विभागाने तुरंत करावे
नियमाप्रमाणे त्यांचे जबाबदारीवर सुधारणा करावी
टेंडर सदर करणेस व पुढील कार्यवाही
सादर करावे साहेब

(स्वाक्षरी) 05/04/23

प्रियंका राजपूत
(उपायुक्त कर) — चर्चा केली

— सदर बाबत दि.
५०१ समजून घेतले गेले
आहे. otherwise केस
टेंडर/समस्या निर्माण
होऊ शकतात

मा. आयुक्त तथा प्रशासक

श्री — बैठक दि. 26/4, 11.00 वा.
संयुक्त बैठक
6/4/23

(DMC-Tax, CFC,
CAFO, audit)

उल्हासनगर महानगरपालिका
मा. आयुक्त कार्यालय
आवक क्र. ९५९५
दिनांक : 06/04/2023
वेळ : 02:30

कर निर्धारक व संकलक
मा. आयुक्त यांनी वर आदेशाप्रमाणे ओडाशीत
केल्यानुसार तत्काळ बैठकीचे पत्र तयार करुन
पाठवावे (स्वाक्षरी) 21/04/23